

# MAHILA MAHAVIDYALAYA

## AMRAVATI


Opp.SBI Main Branch, Jog Chowk, Amravati.

Telephone: 0721-2571115

E-mail: mahilamahavidyalaya.amt@gmail.com website: www.mmv.ac.in


# AQAR ACADEMIC SESSION 2022-2023

# Criterion III

### 3.3.2: Number of research papers per teachers in the Journals notified on UGC website during the last five years

## Related Documents

*Submitted to*

**THE NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

Azadi Ka Amrit Mahotsav

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

ऋते ज्ञानान्न मुक्तिः

# Srujan Prabhat

## A Biannual Research Journal

ISSN : 2249-1171 | Volume - II | October 2022 | Issue - II

**SPECIAL EDITION**

Government Vidarbha Institute of Science And Humanities (Autonomous), Amravati
NAAC Re-accredited 'A' Grade with CGPA 3.32

**Name of Journal**
Srujan Prabhat

**Periodicity**
Half Year

**Language**
English / Marat



**Executive Editors**

**Mr. Bhim Raskar**
Director,
Resource and Support
Center for Development
(RSCD), Mumbai

**Dr. Pratibha Bhorjar**
Prof. & Head,
Dept. of Political Science
Government Vidarbha Institute of
Science & Humanities, Amravati

**Dr. Alka Deshm**
President, Rajyashastra
Vidharbh Prant, Na

**Chief Editor**

**Dr. Bhagaban Narayan Panda**
Dept. of Sanskrit
Government Vidarbha Institute of Science
& Humanities, Amravati

**Co-Editors**

**Dr. K. H. Wasnik**
Professor, Dept. of Political Science
Government Vidarbha Institute of
Science & Humanities, Amravati

**Dr. S. S. Ingale**
Asst. Professor, Dept. of Political Scien
Government Vidarbha Institute of
Science & Humanities, Amravati

**Peer Review Committee**

**Dr. Sanjay Ahire**
Assistant Professor
H. P. T. Arts and R. Y. K. Science
College, Nashik.

**Dr. Rahul Bavage**
Professor and Head
Department of Political Science
Vasantrao Naik Government Institute
of Arts and Social Science, Nagpur

**Dr. Dharmendra Telgote**
Principal, B. D. P. College,
Parawa, Yawatmal



**Published By**

**Department of Sanskrit**

**Printed By**

**Shri Gurudeo Printers**
Mahatma Phule Sankul, in Front of Abhiyanta Bhavan,
Shegaon Naka, V. M. V. Road, Amravati.

**Place of Publication**

**Department of Sanskrit**
**Government Vidarbha Institute of Science & Humanities, Amravati**



The views, expressed by the authors, are their own opinions.
The Institute or the Journal is not the responsible for that.

| | | | |
|---|---|---|---|
| 43 | स्थानिक स्वराज्य आणि महिला नेतृत्व | डॉ. अर्चना ज्ञा. पाटील | 191-195 |
| 44 | स्थानिक स्वराज्य आणि महिला नेतृत्व | प्रा. देवेंद्र उत्तमराव ठाकरे | 196-199 |
| 45 | ७३ वी घटना दुरूस्ती व पंचायत राज व्यवस्था | डॉ. सुनंदा तिडके | 200-202 |
| 46 | स्थानिक स्वराज्य संस्थेसमोरील आव्हाने | डॉ. प्रशांत विघे | 203-207 |
| 47 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला नेतृत्व | अमित पुरूषोत्तम इंगोले<br>प्रा.डॉ. विनायक कोडापे | 208-211 |
| 48 | महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास | डॉ. डी.के. खोकले | 212-214 |
| 49 | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्वाचा विकास : एक अवलोकन | प्रा.डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड | 215-219 |
| 50 | स्थानिक स्वराज संस्था आणि महिला सबलीकरण | डॉ. स्वप्ना त्र्यं. लेंडे | 220-224 |
| 51 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि गांधी विचारांची प्रासंगिकता | डॉ. विष्णु पुंजाजी पवार | 225-229 |
| 52 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास विषेश-संदर्भ:- गोंदिया जिल्हा | डॉ. एच. पी. पारधी | 230-235 |
| 53 | स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व | प्रा. मेघराज आर. शिंदे | 236-237 |
| 54 | ग्रामव्यवस्थेचा ऱ्हास व नागरीकरण | डॉ. दिनेश स. धाकडे | 239-242 |
| 55 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्थानिक लोकांचा लोकसहभाग | प्रा. डॉ. आशिष दि. काळे | 243-245 |
| 56 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि गांधीवादी विचारांची प्रासंगिकता | डॉ. प्रविण जयकृष्ण गुल्हाने | 246-250 |
| 57 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास | डॉ. एल. जी. सोनुले | 251-253 |
| 58 | सत्तेचे विकेंद्रीकरण व ग्रामस्वराज्याची संकल्पना | डॉ. पंकज परसराम नंदेश्वर<br>डॉ. प्रिया अनिरूद्ध सांगोले | 254-256 |
| 59 | महात्मा गांधी यांची स्थानिक स्वशासन संकल्पना | डॉ. प्रमोद एम. तालन<br>डॉ. निना चवरे | 257-259 |
| 60 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास | प्रा. डॉ. कल्पना एस. गोडघाटे | 260-263 |
| 61 | ग्रामीण विकासात स्थानिक शासनाची भूमिका | प्रा. डॉ. चावरे एम. व्ही. | 264-267 |
| 62 | महात्मा गांधीचे सर्वोदयी विचार आणि ग्रामीण विकास | प्रा. डॉ. रविंद्र भणगे | 268-276 |
| 63 | ग्रामीण विकास आणि महिला नेतृत्व (विशेष संदर्भ चंद्रपूर जिल्हा) | प्रा. डॉ. राजेंद्र सदाशिव मुद्दमवार | 277-282 |

Srujan Prabhat
- A biannual Research Journal
ISSN : 2249-1171
Srujan Prabhat / Vol. IV/ Issue -II / Oct.-2022

# स्थानिक स्वराज्य संस्था आणि गांधीवादी विचारांची प्रासंगिकता

**डॉ. प्रविण जयकृष्ण गुल्हाने**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय, अमरावती. मो.नं. ९३२५६३०९६६

**सारांश :–**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गाव हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. गांधीजी स्वयंपूर्ण गावाचे स्वप्न पाहताना म्हणतात, जर माझे स्वप्न खरे होणार असेल तर देशातील सात लाख गावामधील प्रत्येक गाव गणतंत्र बनेल. त्यात कोणीही निरक्षर नसेल, कोणी बेरोजगार नसेल, प्रत्येकाजवळ भरपूर काम असेल आणि पौष्टीक आहार असेल. हवेशीर घर असेल, गावकऱ्यांना आरोग्याच्या आणि स्वच्छतेच्या नियमांचे ज्ञान असेल व ते त्या नियमांचे पालन करत असतील.१ आज गावाची वाटचाल गणतंत्राच्या दिशेने असली तरी आणि साक्षरतेचे प्रमाण वाढत असले तरीही कोणीही बेरोजगार नसेल, प्रत्येकाकडे भरपूर काम असेल हे गांधीजींचे स्वप्न अजूनही पूर्णपणे साकार झालेले नाही. गांधीजी म्हणतात गावातील लोकांचा पौष्टीक आहार असेल, हवेशीर घर असेल, आजही गावातील अनेक लोकांना हातमजूरी केल्याशिवाय पोट भरता येत नाही. दारिद्र्यरेषेखाली येणाऱ्या लोकांना अंत्योदय योजनेअंतर्गत जे धान्य मिळते त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. त्या धान्यातील पौष्टीकता किती उत्कृष्ट दर्जाची राहते याची जाणीव त्या कष्टकरी लोकांनाच आहे. हवेशीर घर असेल असे गांधीजी म्हणतात. परंतु अनेक लोकांकडे हवेशीर तर सोडा पण स्वतःचे घरच नाही. नुकतेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सरकारने 'हर घर तिरंगा' हा उपक्रम राबविला. संपूर्ण भारतीयांनी याला भरभरून प्रतिसादही दिला परंतु या दरम्यान सोशल मिडीयावर एक पोस्ट प्रचंड व्हायरल झाली ती म्हणजे 'इसके पास तिरंगा है इसको घर चाहिए'. स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण होऊन सुद्धा अजूनही दारिद्र्य संपले नाही. गांधीजींनी मानवी स्वास्थ्याकरिता स्वच्छतेला महत्त्व दिले. परंतु आजही लोकांमध्ये स्वच्छता पूर्णपणे रूजली नाही. आज गावातील घराघरात मोबाईल आहे परंतु प्रत्येक घरी शौचालय आहेच असे म्हणता येत नाही. त्यामुळे गांधीजींनी स्वयंपूर्ण ग्राम संदर्भात आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यासंदर्भात प्रकट केलेले विचार आजही प्रासंगिक ठरतात. प्रस्तुत शोध निबंधामध्ये स्थानिक स्वराज्याच्या संदर्भात गांधी विचारांची प्रासंगिकता या घटकावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**प्रस्तावना :–**

लोकांच्या स्थानिक स्वरूपाच्या गरजांची, समस्यांची, काही सार्वजनिक उपाययोजनेच्या कामांची पूर्तता करणारी आणि समस्येची सोडवणूक करणारी व्यवस्था म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. स्थानिक पातळीवर लोकांना उन्नत करण्याचे महत्त्वाचे कार्य या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून केले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थानिक शासन, स्थानिक प्रशासन अशा विविध नावाने ओळखले जाते. कायद्याने निर्माण झालेली, एका ठराविक क्षेत्रातील लोकांना एकसंध करणारी, लोकांचे पालकत्व स्वीकारणारी, राज्यशासनाची घटक म्हणून संचालक मंडळाद्वारे नियंत्रित केली जाणारी व त्या परिसरातील लोकांच्या गरजा समाधनकारकपणे सोडविणारी संस्था म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय.२ विल्यम रॉबसर्न यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना लोकशाहीचा कणा म्हटले आहे तर डी. टोकविल यांनी स्थानिक

स्वराज्य संस्था म्हणजे लोकशाहीचे पाळणा घर होय३ असे म्हटले आहे. राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. भा. ल. भोळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना नागरिकांवर लोकशाहीचे संस्कार करणाऱ्या पाठशाला असे म्हटले आहे. त्यांच्या मते, राज्यसंस्थेच्या कारभारात सामान्य माणसाने लक्ष घालून आणि प्रत्येक निर्णय स्वत: समजून उमजून करण्याची जी लोकशाही शीस्त आहे ती स्थानिक स्वराज्याच्या प्रयोगातून त्याला लागू शकते. तो स्वत:च्या विवेकाने व विचाराने निर्णय घ्यायला शिकतो. लोकशाहीचा सक्रिय भागीदार व्हायला शिकतो. प्रतिनिधी निवडताना कोणती खरबदारी घ्यावी, कोणते निकष वापरावे हे जसे त्याला कळते त्याचप्रमाणे आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींची जबाबदारी काय असते हेही त्याला कळून येते.४ थोडक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून स्थानिक जनतेला राजकीय प्रशिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य केले जाते. स्थानिक लोकांमध्ये नेतृत्त्व विकास घडवून आणणे, महिलांचा राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढविणे आणि समस्यांची, प्रश्नांची सोडवणूक करण्याची क्षमता स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण करणे ज्यामधून स्वयंपूर्ण गाव निर्माण होईल. महात्मा गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे खरा भारत हा सात लाख खेड्यांमध्ये वसलेला आहे. त्याला विकसित करण्याचे कार्य स्थानिक स्वराज्य संस्थांचे आहे. खेडे हा भारताचा पाया आहे. हा पाया जितका मजबूत असेल तेवढाच भारत समृद्ध होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात गांधीजींचे अनेक विचार आजही प्रासंगिक आहे.

**संशोधन पद्धती :–**

प्रस्तुत शोध निबंधाकरिता सामाजिक, विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्था आणि महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता :–**

लोकसंमती नुसार चालणाऱ्या शासन व्यवस्थेला गांधीजींनी 'स्वराज्य' असे म्हटले आहे. गांधीजींच्या स्वराज्यामधील पंचायतराज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. गांधीजींची पंचायतराज ही संकल्पना वास्तविक विकेंद्रीकरणावर आधारीत आहे. स्थानिक पातळीवर सरकारे स्थापन केली पाहीजे ही कल्पना गांधीजींनी मांडली. स्थानिक पातळीवर अधिकार असणे म्हणजेच स्थानिक स्वराज्य असणे ही कल्पना यातूनच निर्माण झाली.५ गांधीजींच्या पंचायतराज विचारांचा समावेश संविधानातील कलम ४० मध्ये करण्यात आला आहे. ७३ व्या घटना दुरूस्तीने पंचायतराज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झालेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गांधीजींचा सर्वाधिक भर गाव या घटकावर राहिला आहे. गांधीजी म्हणतात, भारताच्या खऱ्या लोकशाहीत प्रत्येक गावाला एक घटक मानले जाईल. तिचे संचालन खालून म्हणजेच प्रत्येक गावातील लोक करतील. स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत गाव पातळीवर गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) गांधीजी म्हणतात, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्य करणाऱ्या व्यक्ती प्रामाणिक आणि मेहनती असाव्यात. त्यांच्या कार्यकर्तृत्वातून लोकांनी प्रेरणा घेतली पाहिजे. त्यांनी आपले कार्य जर व्यवस्थीतपणे पार पाडले तर संपूर्ण भारतातील लोक तुमचे आदर्श गाव पाहण्याकरिता येतील आणि तुमच्याकडून प्रेरणा घेतील. वर्तमान काळात उदाहरण दयायचे झाल्यास महाराष्ट्रातील राळेगण सिद्धी आणि हिवरे बाजार ही गावे याचे उत्तम उदाहरण आहे. अशा प्रकारच्या आदर्श गावांची संख्या अधिकाअधिक वाढावी याकरिता गांधीजींचे हे विचार आजही प्रासंगिक आहे.

२) गांधीजींच्या स्वराज्य या संकल्पनेचा केंद्रबिंदू ग्राम म्हणजे खेडे हा आहे. खेड्यांची स्वयंपूर्णत: व्हावी आणि खेडे आपल्या पायावर उभी व्हावी याकरिता गांधीजींनी रचनात्मक कार्यक्रम सांगितला आहे. खेडे स्वयंपूर्ण व्हावी याकरिता गावात शाळा, स्वच्छता, आरोग्य, ग्रामोद्योग, पशूपालन, गोरक्षण, दारूबंदी, ग्राम प्रदर्शन, समग्र ग्राम सेवा, उत्पादनाकरिता जमिनीचे नियोजन, मूलभूत शिक्षण, मुलांना खेळण्याकरिता मैदान, औषधालय इत्यादली गोष्टींचा पुरस्कार गांधीजी करतात. ग्रामविकासाच्या संदर्भात गांधीजींचे हे विचार आजही प्रासंगिक आहे.

३) सत्तेचे विकेंद्रीकरण आणि लोकशाहीचे मजबूतीकरण करण्याकरिता गांधीजींच्या पंचायतराज व्यवस्थेची आजही प्रासंगिकता आहे. त्यामुळे सत्तेवर येणारे प्रत्येक सरकार ग्रामविकासाकडे विशेष लक्ष देत आले आहे. राज्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना अंतर्गत ग्रामीण लोकांना रोजगार व गावामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. पंचायतराज संस्थांचा सर्व कारभार ई–पंचायत प्रकल्पांतर्गत संगणीकृत करून त्यामध्ये एकसुत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.६ ही गांधी विचारांची प्रासंगिकता आहे.

४) गांधीजींनी आपल्या पंचायतराज मध्ये स्वंयपूर्णतेचा संदेश दिलेला आहे. त्याच दिशेने भारताची वाटचाल सुरू आहे. आज भारत सरकार तसेच भारतातील घटक राज्य सरकारसुद्धा जनतेसाठी विशेषत: ग्रामीण भागातील जनतेकरिता विविध सुविधा पुरवित आहे. बचत गट, तंटामुक्त गाव, स्वयंपूर्ण ग्राम, स्वच्छ ग्राम, आदर्श ग्राम अशा विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून गांधी विचार प्रासंगिक ठरत आहे.

५) गांधीजी म्हणतात भारत गावांनी मिळून बनलेला आहे. परंतु आमच्या बुद्धीवादी वर्गाने त्याची उपेक्षा केली. ग्रामीण जीवन शहरी जीवनाची नक्कल वा त्याची पुरवणी नसावी, शहरी लोकांनी ग्रामीण जीवनपद्धतीचा अवलंब केला पाहिजे आणि गावाकरिता आपले जीवन समर्पित केले पाहिजे.७ गांधीजी मंत्र्यांना संदेश देतांना म्हणतात केवळ शहराची सेवा करून तुमचे मंत्रीपद यशस्वी झाले असे तुम्ही दाखविणार असाल तर भारत त्याच्या सात लाख गावांमध्ये वसतो हे तुम्ही विसराल.८ गांधीजींनी सर्वांचे लक्ष हे गावाकडे वेधले आणि गावाचे महत्त्व लक्षात आणून दिले.

६) गांधीजींची समग्र गावसेवेची कल्पना अतिशय व्यापक स्वरूपाची आहे. गावात कोणताही उद्योग करणारी व्यक्ती हा सर्व कलेत निपूण असला पाहिजे. गांधीजी गावातील उद्योग व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींकडून कौसल्याची अपेक्षा करतात. त्यांनी आपल्या व्यवसायामध्ये सर्वोच्चता मिळवावी आणि इतरही विषयासंदर्भात गावातील लोकांमध्ये जनजागृती निर्माण करावी. गावातील व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीचे कार्यक्षेत्र गांधीजींच्या दृष्टीने व्यापक आहे. ते स्वार्थी, संकुचित मुळीच नाही. गांधीजींनी मांडलेली कुटीरउद्योगाची संकल्पना आजही प्रासंगिक ठरते आहे.

७) गांधीजी म्हणतात स्वराज्य हा एक पवित्र, वैदिक शब्द असून आत्मशासन व आत्मसंयम असा त्याचा अर्थ आहे. आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गावपातळीवर निवडणूका घेतांना लोकांची परस्परांमध्ये चढाओढ, स्पर्धा लागलेली असते, केवळ सत्ताप्राप्ती हा भाव असतो आणि बाह्य देखावा मात्र वेगळा असतो. गांधीजींनी अशा प्रकारचे स्वराज्य अपेक्षित नव्हते म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आत्मसंयम आणि आत्मशासन या घटकाला महत्त्वाचे स्थान आहे. गांधीजींचे हे विचार महत्त्वाचे ठरतात.

८) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वधर्म समभाव टिकवून ठेवण्यासाठी गांधीजी म्हणतात, आपण सर्व एका भव्य वृक्षाची पाने आहोत आणि या वृक्षाची मुळे पृथ्वीच्या गर्भात अशा रीतीने रूजली आहेत की, त्या मुळापासून

वृक्षाला वेगळे करता येऊ शकत नाही. कितीही मोठे वादळ आले तरी ते या वृक्षाला जागेवरून हलवू शकणार नाही.९ गांधीजींच्या विचारातून सार्वजनिक सामंजस्याची, एकात्मतेची भावना वृद्धींगत होते. निवडणूकीच्या काळात गावपातळीवर वातावरणात थोडा बदल जाणवत असला तरी शेवटी लोकांना हे माहीत आहे की आपण सर्व एकाच वृक्षाची पाने आहोत. म्हणजे आपण एकाच गावची प्रजा आहोत. परस्परांमधील मतभेद दूर सारून गावाच्या विकासासाठी आपण कटीबद्ध असलो पाहिजे ही भावना त्यांच्यामध्ये गांधीवादी विचारांमुळे वृद्धींगत होते.

९) भारतात गांधीजींनी गावच्या स्वच्छतेसंदर्भात १४ फेब्रुवारी १९१६ मध्ये सार्वजनिक रूपात आपले विचार मांडले. गावच्या स्वच्छतेवर लक्ष केंद्रीत केले जाणे आणि स्वच्छतेचे महत्त्व शाळा आणि महाविद्यालयाच्या पाठ्यक्रमात सामील करणे आवश्यक आहे. २० मार्च १९१६ मध्ये गुरूकूल कांगडीमध्ये दिलेल्या भाषणामध्ये त्यांनी म्हटले होते की, गुरुकुलच्या मुलांना स्वच्छतेकरिता आणि त्याच्या नियमाचे पालन करणे सुद्धा प्रशिक्षणाचा एक भाग असला पाहिजे.१० महात्मा गांधीजींच्या पुढाकाराने विद्यापीठाअंतर्गत विविध महाविद्यालयांमध्ये राबविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यार्थ्यांना ग्रामस्वच्छतेचे केवळ प्रशिक्षण दिले जात नाही तर दत्तक ग्राम मध्ये शिबिरे आयोजित करून ग्रामस्वच्छता केली जाते. तसेच गांधीजींच्या जन्मदिनी भारतात स्वच्छतेची मोहिम राबविली जाते. यामध्ये देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी स्वत: झाडू हाती घेऊन संपूर्ण भारतीय नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व नव्याने जाणवून दिले. गांधीजी म्हणतात, सामुहिक स्वच्छतेकरिता सामुहिक विवेकाची गरज आहे. गांधीजींचे हे विचार आजही प्रासंगिक आहेत.

१०) गांधीजींनी गावाच्या स्वच्छतेबरोबरच आरोग्याच्या स्वच्छतेवरही भर दिला आहे. उत्तम आरोग्याचे महत्त्व सांगताना गांधीजी म्हणतात आपल्या आरोग्याची खरी निगा आपणच राखू शकतो. त्यांच्या मते, डॉक्टरांचे असे म्हणणे आहे की, नव्वद टक्के आजार घाणेरडेपणा, चुकीच्या आहाराने होतात. त्यामुळे आहाराकडे आणि स्वच्छतेकडे आपले लक्ष असले पाहिजे तेव्हाच गावातील नागरिका हे सक्षम बनतील. कोणतीही व्यक्ती जर बेफिकीरपणे इकडे-तिकडे थूंकून, केरकचरा फेकून वा इतर प्रकारे जमीन घाणेरडी करून हवा दुषीत करीत असेल तर ती व्यक्ती माणूस आणि निसर्ग या दोघांच्याही विरूद्ध पाप करत असते.११ गांधीजींचे आरोग्याच्या स्वच्छतेसंबंधीचे हे विचार आजही प्रासंगिक आहे. गांधीजींच्या या विचारांचे पालन जसे कोरोना काळात मानवाने अतिशय तंतोतंतपणे केले तसेच अविरतपणे जर मानवाने मग ते केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांअंतर्गत येणारीच प्रजा नाही तर संपूर्ण मानवी समुदायाने या विचारांचे अनुकरण केले तर त्याचा फायदा संपूर्ण विश्वाला नक्कीच झाल्याशिवाय राहणार नाही.

**निष्कर्ष :–**

गांधीजींच्या विचारांचा केंद्रबिंदू खेडे राहिले आहे. गांधीजी म्हणतात, गावाचे पुनरूज्जीवन तेव्हाच शक्य आहे जेव्हा त्यांचे शोषण बंद होईल. म्हणूनच गावाच्या विकासाकरिता शासन संस्थांकडून विविध प्रकारच्या योजना अविरतपणे सुरू आहे. आज अनेक गावे ही विकासाच्या मार्गाकडे पदार्पण करीत आहे. गांधीजींनी गावाच्या स्वयंपूर्णतेकरिता गावात सार्वजनिक भवन असावे, वाचनालय असावे, शाळा, आरोग्य केंद्र, पाणी पुरवठ्याची व्यवस्था, मैदानांची व्यवस्था इत्यादी बाबी असाव्यात असे सांगितले या सर्व गोष्टी स्थानिक स्वराज्य संस्थांअंतर्गत राबविल्या जात आहे. शहरातील कॉलन्या हे याचे उत्तम उदाहरण आहे. ग्रामीण भागामध्ये आमच्या गावामध्ये आम्हीच सरकार, आदर्श

ग्राम, तंटामुक्त ग्राम तसेच संसद सदस्यांची गाव दत्तक घेऊन गावचा विकास करण्याची संकल्पना यामधून हळूहळू ग्रामविकासाला चालना मिळत आहे. आज गावातील लोकांमध्ये राजकीय प्रक्रियेबद्दल जागृती निर्माण होत आहे. एक प्रकारे स्थानिक स्तरावर लोकशाहीचे मजबूतीकरण होत आहे. आवश्यकता आहे ती राजकीय नीतिमूल्यांच्या पालनाची. भारतात सत्तेचे विकेंद्रीकरण असल्यामुळे वरच्या पातळीवरील राजकीय संस्कार हे स्थानिक पातळीवर आपोआप झिरपत असतात. जनता निद्रीस्त असताना रात्रीतून शपथ घेणे याचे अनुकरण स्थानिक स्तरावर जनतेने करू नये याकरिता गांधीजींनी सांगितलेली सात सामाजिक पापे (तत्त्वाविना राजकारण, श्रमविना संपत्ती, विवेकाविना सुख, चारित्र्याविना शिक्षण, नीतिविना व्यापार, मानवतारहीत विज्ञान, त्यागाविना पुजा) सर्वांनी लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. थोडक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाकरिता सृजनशील नागरिक म्हणून भारतातील सर्व जनतेने गांधीजींचे मुल्यात्मक विचार अंगिकारण्याची आणि त्याप्रमाणे आचरण करण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :-**


१. गांधीजी, 'हरीजन', ३०/०७/१९३८, पृ.क्र. २००

२. लेवटे किशोर, 'पंचायतराज', किशोर लेवटे पब्लिकेशन पुणे, मार्च २०२२, पृ.क्र.८

३. उपरोक्त

४. भोळे भा. ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृ.क्र. ३५३

५. चपळगांवकर नरेंद्र, 'महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटना', राजहंस प्रकाशन, पुणे, मार्च २०१३, पृ.क्र. १०६

६. लोकराज्य, ऑक्टोबर २०१७, पृ.क्र.५४

७. गांधीजी, 'हरीजन', ०३/११/१९४६, पृ.क्र. ३८१

८. गांधीजी, 'हरीजन', २५/०८/१९४६, पृ.क्र. २८२

९. गांधीजी, 'हरीजन', ०४/०८/१९४०, पृ.क्र. २३५

१०. प्रतियोगिता दर्पण, एप्रिल, २०१८, पृ.क्र. ८७

११. गांधीजी, 'हरीजन', ०७/०४/१९४६, पृ.क्र. ६९


*****



# Government Vidarbha Institute of Science And Humanities (Autonomous), Amravati

**NAAC Re-accredited 'A' Grade with CGPA 3.32**

Website : www.gvishamt.org. | Email : directorgvishamravati@gmail.com
Ph.No. 0721-2531704 | Fax No. 0721-2531705

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed
## Multidisciplinary International Research Journal

FEBRUARY 2023
(CCCLXXXVIII ) 390

## New Directions in Humanities




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr. Pradnya S. Yenkar**
**Principal,**
Vidya Bharati Mahavidyalaya,
Camp, Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

| | | |
|---|---|---|
| 22 | कोविड-१९ नंतर वाढलेली अर्थव्यवस्थेतील डिजिटल पेमेंट पध्दती प्रा. राजेश माथुरकर | 77 |
| 23 | कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झालेल्या स्त्री पुरुषांचा बाध्यता ग्रस्तता या समायोजन नसविकृती घटकावर झालेल्या परिणामाचा तुलनात्मक अभ्यास प्रा. अरुणा तसरे , प्रो.डॉ. एस.डी. वाकोडे | 81 |
| 24 | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य प्रा. डॉ. मंजुषा धापुडकर | 85 |
| 25 | समाजातील स्त्रिया, दर्जा व अधिकार प्रा डॉ दीपक आनंदराव चौरपगार | 88 |
| 26 | श्री गोविंदप्रभु विषयक साहित्यातील जननिष्ठा प्रा. डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे | 91 |
| 27 | कोविड-१९ आणि सद्याचे बदलते जागतिक राजकारण अमित पुरूषोत्तम इंगोले | 94 |
| 28 | तुकडोजी महाराजांचे साहित्यातून स्वातंत्र्याला योगदान प्रा. अमृता दीपक तायडे | 101 |
| 29 | थेरीगाथा आणि आधुनिक स्त्रीवादी कादंबरीतून व्यक्त झालेला स्त्रीवाद : चिकित्सक अध्ययन प्रा. डॉ. विश्वजीत कांबळे | 108 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO-390-B
ISSN : 2278-9308
February. 2023

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य

प्रा. डॉ. मंजुषा धापुडकर

इतिहास विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय अमरावती . फोन नं 9372910483

**प्रस्तावना** :- विदर्भातील बहुजन समाजाचे प्रमुख नेते व शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी अतिशय महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावी एका शेतकरी कुटुंबात 27 डिसेंबर 1898 मध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पापळ म्हणजेच त्यांच्या जन्मगावी झाले. मॅट्रिक नंतर त्यांनी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. उच्च शिक्षणासाठी त्यांना इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. एडींबरो विद्यापीठाची एम. ए व ऑक्सफर्ड विद्यापीठाचे डि.लिट या पदव्या त्यांनी मिळविल्या. वैदिक वाङमय यातील धर्माचा उदय आणि विकास या प्रबंधाबद्दल त्यांना डॉक्टरेट बहाल करण्यात आले. तसेच त्यांनी इंग्लंडमध्ये असताना बार - अॅट - लॉ ही पदवी संपादन केली. शिक्षण मिळविल्यानंतर मोठ्या पगाराची उच्च नोकरी मिळत असताना देखील त्यांनी वकिली पेशाला प्राथमिक स्थान दिले व स्वतंत्र वकिली व्यवसाय सुरू केला. येथूनच त्यांच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली

सामाजिक सुधारणेकडे वळताना सर्वात आधी त्यांनी सुधारण्याची सुरुवात स्वतःपासून करून सामाजिक सुधारणेचा पाया घातला. त्यांनी सोनार जातीतील विमलबाईंशी आंतरजातीय विवाह सत्यशोधक पद्धतीने केला आणि प्रस्थापित समाजामध्ये ज्या प्रकारची जाती व्यवस्था होती. जातीजातीमध्ये तेढ होते त्याला छेद देण्याचा प्रयत्न करून तो समाजासमोर यशस्वी केला. भाऊसाहेब अमरावती जिल्हा कौन्सिलचे 1928 ते 1930 पर्यंत अध्यक्ष होते. प्रांतीय कायदे मंडळावर 1930 मध्ये त्यांची निवड झाली सर मॅटिग्यू मंत्रिमंडळात लोककर्म खात्याचे मंत्री म्हणून कामगिरी लोक कर्म बजावली. तसेच भारताच्या घटना समितीचे सभासद देखील होते. इ.स. 1952, 1957, 1962 या कालखंडात लोकसभेवर निवडून आले. 1952 ते 1962 या काळात ते केंद्रीय मंत्रिमंडळात कृषिमंत्री होते. याच काळात त्यांनी समाजासाठी शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी महत्त्वाची कामगिरी पार पाडली. वकिली व्यवसाय करीत असताना समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी आपले नेतृत्व बहाल केले.

1) **श्रद्धानंद वसतिगृहाची स्थापना** :- सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतल्यानंतर बहुजन समाजाची खालावलेली अवस्था त्यांचा मागासलेपणा या कारणांचा त्यांनी अभ्यास करून त्यांच्या उन्नतीचा मार्ग शोधला. शिक्षण हे बहुजनांच्या विकासासाठी महत्त्वाचे हत्यार असून बहुजनांच्या घरात शिक्षण पोहोचावे. मागासलेल्या समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात सामील करण्याकरिता त्यांनी आर्य समाजाचे प्रचारक, प्रसारक, श्रद्धानंद यांच्या अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांच्या नावाने श्रद्धानंद वस्तीत देवाची स्थापना 1927 ला अमरावती येथे करून त्यांचे पुरोगामी विचार मरण उपरांत जीवीत ठेवण्याचे काम केले तसे वस्तीगृह येथे सर्व समाजातील मातंग महार कोळी माळी मराठा सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिला समानतेची वागणूक देण्याच्या दिशेने भाऊसाहेबांनी एक मोठे पाऊल उचलले भाऊसाहेबांच्या रचनात्मक कार्याला अनेक सणात त्यांनी प्रखर विरोध केला तरीही कोणाच्याही विरोधाला आणि प्रभावाला न जुमानता भाऊसाहेबांनी आपले रचनात्मक कार्य जोमाने सुरू ठेवले त्यांच्या या कार्याला संत गाडगेबाबांनी सुद्धा पाठिंबा दिला.

2) **श्री शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळाची स्थापना** :- अमरावती येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या धर्तीवर श्री शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळाची स्थापना केली. शारीरिक शिक्षणाची ओढ तरुणांच्या मनात निर्माण व्हावी योग्य ती पृष्ठभूमि त्यांना मिळावी त्याचबरोबर त्यांच्या मानसिक विकासाबरोबर शारीरिक विकास व्हावा हा भाऊसाहेबांचा उद्देश होता. त्यांना या कार्यात मोहोड बंधू यांचे सहकार्य लाभले.

3) डॉ. पंजाबराव देशमुख सक्तीचे शिक्षण पुरस्कर्ते :- शिक्षण हे भारतीय समाजाच्या उद्धारासाठी महत्त्वाचे साधन आहे. बहुजनांच्या सामाजिक परिस्थितीमध्ये शिक्षणानेच बदल होऊ शकतो याची जाणीव भाऊसाहेबांना होती. बहुजनांच्या उद्धारासाठी ज्याप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज यांनी शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. त्याच प्रमाणे 1928 ला भाऊसाहेबांनी अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्षपद हाती घेतल्यानंतर सार्वजनिक शिक्षण स्वस्त व सुलभ करणे हा उपक्रम हाती घेतला. त्यासाठी प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा कौन्सिलच्या उत्पादनात वाढ करणे, जनतेकडून मिळणाऱ्या करांमध्ये वाढ करणे अशा कार्याद्वारे जिल्हा कौन्सिलच्या उत्पादनात रुपये 55 हजारांनी वाढ केली यातूनच जिल्ह्यामध्ये एकूण 100 शिक्षणाची केंद्रे उघडण्यात आली व 11 वर्षापर्यंतच्या मुला-मुलींना प्राथमिक शिकृषण सक्तीचे केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना भाऊसाहेबांनी खामगाव येथील शिक्षण परिषदेत 1917 मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे बीज रुजवताना जो विचार ठेवला होता तो म्हणजे शिक्षणाची दालने बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उघडी करून देणे उघडी करणे या त्यांच्या कृतिशील विचारातून आज पश्चिम विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रामध्ये देखील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या फांदीचा तयार झालेला दिसून येतो व या संस्थेकडून शिक्षणाचा प्रचार प्रसार शहरापासून ते गावागावांमध्ये झालेला दिसून येतो सुरुवातीला विदर्भ मराठा समाज मंडळाची स्थापना शिक्षण प्रेमी तसेच लोकवर्गणीतून करून मराठा हायस्कूल ची स्थापना अमरावती येथे केली पुढे अपुऱ्या मदती अभावी विदर्भ मराठा समाजाला हे हायस्कूल बंद करावे लागले परंतु या हायस्कूल ला चालविण्याकरिता शिक्षकांनी स्वतः संस्थेचे नाव रजिस्टर करून भाऊसाहेबांनी मिळून शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली हळूहळू संस्थेचे नाव लौकिक झाले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळा, हायस्कूल, महाविद्यालय तसेच विद्यार्थ्यांच्या निवासाच्या सोयीसाठी वसतिगृहे गावांमध्ये, शहरांमध्ये, खेडोपाडी स्थापन करण्यात आली. त्यामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक सोयीचे झाले.

4) अंबादेवी मंदिर मंदिरामध्ये प्रवेश करण्याकरिता केलेले कार्य :-डॉ. पंजाबराव देशमुख यांनी महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांचा वारसा पुढे चालविण्याचे कार्य केले. त्यांनी अस्पृश्यांच्या उद्धारा साठी अथक प्रयत्न केले. त्यातीलच एक प्रयत्न म्हणजे अस्पृश्यांना अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात प्रवेश मिळवून देणे होय. हिंदूंची मंदिरे सर्व हिंदूंना का मोकळी असू नयेत असा प्रश्न डॉ. पंजाबराव देशमुख यांनी समाज क्रांतीच्या क्षेत्रात उपस्थित केला. हिंदू धर्मशास्त्राच्या इतिहासात हा प्रश्न उपस्थित करणारा डॉ. पंजाबराव हा पहिला समाज क्रांतिकारक होय. डॉ. पंजाबराव देशमुख 1925 पासूनचअस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्नशील होते. पण लोक जागृती शिवाय अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळणार नाही म्हणून भाऊसाहेबांनी 23 सप्टेंबर 1926 ला हनुमान आखाड्याच्या पटांगणात एक जाहीर सभा घेऊन समिती गठीत केली व स्वतः अध्यक्ष झाले. तसेच समितीद्वारे गावोगावी जाऊन समितीमार्फत मानव सर्व समान आहे व त्यांना तेथे जाण्याचा अधिकार आहे हे कोणत्याही विरोधाला न जुमानता मानवी हक्कासाठी लढत राहू असे ठणकावून सांगितले. 13 व 14 नोव्हेंबर 1927 ला प्रांतिक परिषद (इंद्र भवन सभागृह अमरावती) येथे भरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषदेला हजर होते. पंजाबराव देशमुख यांनी आलेल्या प्रतिनिधींना अंबादेवी मंदिर सत्याग्रहाच्या दृष्टीनेही सभेचे महत्त्व समजावून सांगितले. याप्रसंगी भाऊसाहेबांनी हिंदुधर्माचे चिकित्सकपणे मीमांसा केली. शेवटी मंदिराच्या कमिटीने तीन महिन्याचा कालावधी मागितला होता व त्यांनी तीन महिन्याच्या आतच अस्पृश्यांना दर्शनासाठी अंबादेवी मंदिर खुले केले.

5) सहभोजनाचे आयोजन,:- भाऊसाहेबांनी ज्याप्रमाणे जातीयता शिथिल करण्यासाठी श्रद्धानंद वसतिगृहाची स्थापना केली तशाच प्रकारे या जातीयतेला मूठमाती देण्याकरिता भाऊसाहेबांनी अमरावतीच्या आर्यसमाज मंदिरामध्ये 1927 ला स्पृश्य-अस्पृश्य यांचे सहभोजन घडवून आणले.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO-390-B
ISSN : 2278-9308
February, 2023

**निष्कर्ष :-** भाऊसाहेबांच्या खडूनी विदर्भामध्ये शिक्षणाची गंगा घराघरात, गावागावात पोहोचविली. जातिभेद, अस्पृश्यता निवारण, धर्मभेद यातील त्यांचे योगदान अत्यंत मूल्यवान आहे. आपल्या समाजात अस्पृश्यता, जातीव्यवस्था, विषमता व स्त्री पुरुष समानता ही विषारी तत्व आहे या सर्व अमानूष गोष्टींना समाजातून नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सर्व स्तरातून प्रयत्न केले. आजही आपल्याला प्रेरणादायी ठरतात. डॉ. पंजाबराव देशमुख कदाचित भारतात या युगात एकमेव माणूस असावा ज्याने पद, प्रतिष्ठा, पैसा यांना तुच्छ लेखून आपला जीवन यज्ञ चेतवला.

**संदर्भसूची :-**

1) सावरकर सुदाम, सूर्यकर रा. व.- भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख जीवन व कार्य खंड 1 व 2
2) कारंजकर भि.दे. अमरावती शहराचा इतिहास भाग पहिला व दुसरा
3) मोहोड सुधाकर- एक भारतीय जीनियस- लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख
4) डॉ. गव्हाने, किशोर कुमार तथा शिंदे - महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास(1800-1960)
5) मोहिते उत्तमराव - जागतिक कृषक क्रांतीचा विधाता, लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख
6) डॉ. मस्के, बी.आर.- विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास
7) डॉ. कोलारकर श.गो.- आधुनिक विदर्भाचा इतिहास (1885 ते 1947)